क्र. कामगार/क/क.क.नि.स./२१वी बैठक/25890
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्रकाशगड, वांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.
दिनांक :- 5-8-89.

परिपत्रक

-----

विषय :- कर्मचारी कल्याण निधी समिती -
कर्मचा-यांच्या पाल्यांना देण्यात येणा-या
रोख पारितोषिके/शिष्यवृत्तीसंबंधी.

-----

कर्मचारी कल्याण निधी समितीची २१ वी बैठक दि. २२.५.८९ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती व त्या बैठकीत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) कर्मचा-यांच्या ज्या पाल्यांना शिष्यवृत्ति मंजूर करण्यात आलेली आहे परंतु त्यांनी पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमासाठी ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतला असेल त्याच महाविद्यालयात त्याला पदवी (डिग्री) अभ्यासक्रमासाठी एक वर्षानंतर प्रवेश मिळाला तर त्या पाल्यांची शिष्यवृत्ति चालू ठेवावी हा निर्णय १९८७-८८ ह्या शैक्षणिक वर्षापासून अंमलात आणण्यात येईल.

२) कर्मचा-यांच्या ज्या पाल्यांना शिष्यवृत्ति मंजूर करण्यात आली असेल व तो ए.टी.के.टी. मिळून पुढिल परिक्षा उत्तिर्ण झाला असेल तर तो ज्या विषयात अनुत्तीर्ण झाला असेल त्या विषयात उत्तिर्ण झाल्यावर त्याची शिष्यवृत्ति पुढे चालू ठेवावी. तसेच वाढिव गुण मिळून पास झालेल्या पाल्यांचीही शिष्यवृत्ति पुढे चालू ठेवावी.

३) एखाद्या कर्मचा-यांच्या पाल्यांला शिष्यवृत्ती मिळाली असेल व त्या कर्मचा-याचे आकस्मिक निधन झाल्यास त्याच्या पाल्याने किंवा त्याचे पालकत्व स्वीकारणा-या व्यक्तिने शिष्यवृत्ति चालू ठेवण्यास अर्ज केल्यास त्या पाल्याचा शिष्यवृत्ति पुढे चालू ठेवावी. कर्मचारी कल्याण निधीचे हे क्र. २ व ३ चे निर्णय १९८८-८९ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात आणण्यात यावे.

मुख्य कार्यालयातील सर्व विभागीय अधिकारी तसेच सर्व क्षेत्रिय व कामगार विभागातील अधिका-यांना विनंती करण्यात येते की त्यांनी कर्मचारी कल्याण निधी समितीचे वर दिलेले निर्णय सर्व कर्मचा-यांच्या नजरेस आणून द्यावेत.

(सही)
सचिव
कर्मचारी कल्याण निधी समिती/
मुख्य औ. संबंध अधिकारी

प्रत सादर :
१) मुख्य कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख
२) कार्यकारी अभियंता पर्यंतचे सर्व क्षेत्रिय अधिकारी.
३) सर्व उप मु.औ.सं.अ./औ.सं.अ./कल्याण अधिकारी /कामगार अधिकारी.

प्रहवै २१.७.८९